एच-१४५ व्हीटी-जीओव्ही या हेलिकॉप्टरच्या परिरक्षणाची सेवा पुरविणेसाठी मे.इंदमार प्रा.लि.यांच्यासोबतच्या कंत्राटाबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. विचासं-१११९/प्र.क्र.६३/विमान-१
मंत्रालय (विस्तार इमारत), सातवा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०४/११/२०२६

वाचा :- १) उपसंचालक,विमानचालन संचालनालय यांचे पत्र क्र.डीए /एडीएम/५३२/२०२६, दिनांक १३/०७/२०२६.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक विचासं-१११९/प्र.क्र.६३/ २८-अ (विमान-१), दिनांक २१/०६/२०२३.
३) इंदमार एव्हीएशन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या समवेत दिनांक १३/०७/२०२० रोजी केलेला करार.

प्रस्तावना :-

हेलिकॉप्टरच्या परिरक्षणासाठी तीन वर्षांसाठी रु. २,४९,००,०००/- अधिक अनुज्ञेय कर आणि विहित अटी व शर्तीनुसार मे. इंदमार कंपनी प्रायव्हेट लि.मुंबई समवेत करार करण्यासाठी संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात आले आहे व त्यानुसार दि.२८ जुलै,२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तद्नंतर सदर परिरक्षण करारातील दराने, अटी व शर्तीच्या अधिन राहून परिरक्षण करारातील परिच्छेद क्रमांक २ नुसार दिनांक १४/०७/२०२३ ते दिनांक १३/०७/२०२६ या कालावधीसाठी तीन वर्षासाठी मुदतवाढ देण्यास शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक २५/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

यासंदर्भात शक्ती प्रदत्त समितीच्या दि.०१/१०/२०२५ रोजीच्या बैठकीत शासनाने खरेदी केलेल्या एच-१४५ व्हीटी-जीओव्ही या हेलिकॉप्टरच्या परिरक्षणासाठी सेवा पुरविण्यासाठी नवीन निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांच्यामार्फत करण्याबाबत निदेश देण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन नवीन निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही विमानचालन संचालनालयाकडून स्वतंत्ररित्या सुरु आहे. सदर कार्यवाहीस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

यास्तव मे. इंदमार कंपनीसमवेत करण्यात आलेल्या करारास मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

हेलिकॉप्टरच्या परिरक्षणासाठी मे. इंदमार कंपनी प्रायव्हेट लि.मुंबई समवेत करार करण्यात आला असून करारातील अटी, शर्ती व दरपत्रकानुसार दि.१४/०७/२०२६पासून दि.१२/०१/२०२७ पर्यंत नुतनीकरण करण्यास, संदर्भ क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या करारातील परिच्छेद क्र.२ मधील तरतूदीनुसार संचालक, विमानचालन संचालनालय यांना मान्यता देण्यात येत आहे.

२. या बाबतचा होणारा खर्च मागणी क्र.ए-४. "२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमान चालन सल्लागार, महाराष्ट्र शासन (अनिवार्य) २०७० ०१५६" या लेखाशिर्षातंर्गत ५०-इतर खर्च या उद्दिष्टाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६११०४१५००४९४८०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VARSHA SANDEEP TANDEL

Digitally signed by VARSHA SANDEEP TANDEL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=88DDA02271A3AA8E76A7AECF8D6EFC85CB3482A471B1F362CC2A2DF648E88405, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4AD1C69F882FC4BFCFD7FE76EF3A536040E61D009CA9A87AF4CBDB0B0A3E8EF1, cn=VARSHA SANDEEP TANDEL
Date: 2026.11.04 15:01:41 +05'30'

(वर्षा तांडेल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित
२. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई.
३. उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. सामान्य प्रशासन विभाग / कार्या. २५, मंत्रालय, मुंबई
९. निवड नस्ती (विमान-१)